महापालिका सहाय्यक आयुक्त कार्यालय
कोंढवा येवलेवाडी ,पुणे महानगरपालिका
जावक क्रमांकः- ५०१७
दिनांक : ०१/०३/२०२१
संपर्क क्र. ०२०-२५५०८८००
Email- kondhwa@punecorporation.org

## कोविड -१९ सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र आदेश

विषय :- कोरोना विषाणू कोविड-१९ च्या आजाराच्या अनुषंगाने कोंढवा येवलेवाडी कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात असणारे विविध भाग सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र(Micro Containment Zone) जाहीर करणेबाबत.

संदर्भ :- १. साथ रोग अधिनियम १८९७ ची अंमलबजावणी सुरू झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३/०३/२०२०.
२. महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२०.
३. केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५.
४. सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांची अधिसूचना कोरोना- २०२०/५८आरोग्य/५ दि.१३/३/२०२०.

माहे फेब्रुवारीच्या प्रथम सप्ताहापासून कोविड-१९ च्या रूग्ण वाढीचा दर वाढला असून साथ आजाराचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारण्यात येत नाही. ज्या इमारतीमध्ये ५ पेक्षा जास्त कोविड रूग्ण व ज्या सोसायटी मध्ये २० पेक्षा कोविड रूग्ण आहेत. अशा ठिकाणी प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र जाहीर करणे अत्यावश्यक आहे. सद्यस्थिती मध्ये कोंढवा येवलेवाडी कार्यालयाच्या अंतर्गत खालील ठिकाणी कोविड-१९ च्या संसर्ग वाढत असल्याचे दिसून येत आहे.

| अ.क्र. | प्रभाग क्र. | सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र | रुग्ण संख्या |
|---|---|---|---|
| १. | ४१ | थ्री ज्वेल सोसायटी एच विंग | ५ |
| २. | ४१ | कोरोना सोसायटी, दरेकर शाळेजवळ, कोंढवा बु. | ६ |

तरी, कोविड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी सदरचा परिसर सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात येत आहे. वरील परिसर व त्याच्या आजूबाजूच्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी खालील सूचनांचे पालन करणे आवश्यक आहे.

१. सोसायटी / घर / बंगला / चाळ इ.ठिकाणी राहणाऱ्या नागरिकांनी त्यांच्या आवारात अथवा घरी भेट देणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे पल्स ऑक्सिमीटर आणि थर्मल डिटेक्टरच्या साह्याने तपासणी केली जावी. कोविड साठी पल्स ऑक्सिमीटर तपासणी ही दिशादर्शक आहे. ज्या व्यक्तीची ऑक्सिजन स्याचुरेशन लेवल हि ९४ च्या खाली आसल्यास त्यास त्वरीत पुढील तपासणीसाठी महापालिकेचे रूग्णालय अथवा खाजगी डॉक्टर यांचे मार्फत तपासणी करून घेण्यासाठी सूचना देण्यात यावी.

२. सोसायटी / घर / बंगला / चाळ इ.ठिकाणी राहणाऱ्या जेष्ठ व्यक्ती / १० वर्षाखालील मुले / आजाराने ग्रस्त आलेले व्यक्ती यांची पल्स ऑक्सिमीटर दैनंदिन तपासणी करून नोंद ठेवण्यात यावी तसेच या अनुषंगाने ऑक्सिजन लेवल ही ९४ किंवा त्याखाली असल्यास अशा व्यक्तिंची डॉक्टरांच्या सल्ल्याने तत्काळ स्वॅब टेस्ट करून घेण्यात यावी. स्वॅब टेस्ट करणे करीता कोंढवा येवलेवाडी क्षेत्रिय कार्यालयामार्फत राजीव गांधी प्राणीसंग्रहालय, कात्रज व यसाजी कामठे कुस्ती संकुल, कोंढवा बु. येथे मोफत सोय उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. याबाबत अधिक माहिती आवश्यक असल्यास आपल्या परिसरातील आरोग्य निरीक्षक यांच्याशी संपर्क साधण्यात यावा.

३. सोसायटी / घर / बंगला / चाळ इ.ठिकाणी कोविड-१९ व्यतिरिक्त इतर आजाराकरीता रूग्णालयात दाखल असल्याबाबतची माहिती कृपया kondhwa@punecorporation.org ई-मेलवर पाठवावी जेणेकरून पुढील वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यात येईल.

४. सोसायटी / घर / बंगला / चाळ इ.ठिकाणी Social Distance चे पालन केले जाईल व प्रत्येक व्यक्ती मास्क धारण करतील याची दक्षता घ्यावी.

तरी, वरील सूचनांचे तंतोतंत पालन करावे,

मा.स.कळावे,

(डॉ.ज्योती धोत्रे)
महापालिका सहाय्यक आयुक्त
कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालय
पुणे महानगरपालिका

प्रतः

१. मा.अति.महा.आयुक्त(ज), पुणे मनपा
२. मा.सहाय्यक आरोग्य प्रमुख, पुणे मनपा
३. मा.उप आयुक्त,परि.क्र.४, पुणे मनपा
४. मा.वरीष्ठ पोलीस निरीक्षक, कोंढवा बु पोलिस स्टेशन, पुणे शहर